# महाराष्ट्र शासन
# म.आ.पोदार रुग्णालय वरळी , मुंबई

**कार्यालय:- अधिष्ठाता यांचे कार्यालय, म.आ.पोदार रुग्णालय, डॉ. ए.बी. रोड, वरळी, मुंबई-४०००१८**
**दुरध्वनी / फॅक्स- ०२२-२४९३३५३३ email: deanmaph@yahoo.com वेबसाईट - www.ayurvedinstitute.com**

## मागासवर्गीय व इतर पद भरती मोहिम

महाराष्ट्र शासनाचे शा.नि.सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.४५/१२,दि.०३-०६-२०१४ अन्वये म.आ.पोदार रुग्णालयाच्या आस्थापनेवरील गट - ड (वर्ग-४) ची खालील पदे भरण्यासाठी मागासवर्गीय/ खुला प्रवर्गातील इच्छुक व पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यांत येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | सामाजिक आरक्षणाची पदे | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | कक्षसेवक | १६ | अ.जा.-०४ पदे (०१* पदे महीलांसाठी राखीव)<br>अ.ज.-०५ पदे (०२* पदे महीलांसाठी राखीव)<br>वि.जा.अ.-०२ पदे (०१*पद महीलांसाठी राखीव)<br>भ.ज.क.- ०१ पद<br>भ.ज.ड.-०१<br>इ.मा.व.-०३ पदे (१* पदे महीलांसाठी राखीव) | वेतन बॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००/- |
| २ | सेवक | ३ | इ.मा.व.-०३ पदे (१* पदे महीलांसाठी राखीव) | वेतन बॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००/- |
| ३ | शिपाई | १ | ०१ पद इ.मा.व. | वेतन बॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००/- |
| ४ | सफाईगार | २ | ०२ पदे अनारक्षीत | वेतन बॅण्ड रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००/- |
| एकुण | | २२ | | |

***महीलासांठी राखीव असलेली पदे ही संमातर आरक्षणातंर्गत येत असल्यामुळे जर संबधीत प्रवर्गातून महीला उमेदवार उपलब्ध झाला नाही तर सदर प्रवर्गातील पुरुष उमेदवाराचा विचार करण्यात येईल.**

१) **वयोमर्यादा** :- उमेदवाराचे वय दिनांक ३१ डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत खुल्या प्रवर्गासाठी किमान १८ वर्षे कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारासाठी किमान १८ वर्ष व कमाल ३८ असे राहील.

२) **शैक्षणिक अर्हता :-** उमेदवार मान्यताप्राप्त शाळेतून किमान इयत्ता ०४ उत्तीर्ण झालेला असावा.

**इतर सर्वसाधारण अटी व शर्ती :**

३) उमेदवाराकडे जातीचे वैधता प्रमाणपत्र नसल्यास निवड झाल्यानंतर नियुक्ती नंतर ६ महिन्याच्या आंत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय दि.१२-१२-२०११ मधील तरतुदीच्या अधिन राहुन तात्पूरत्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महीन्याचें आत वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

४) महाराष्ट्र राज्य लोकसेवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१(सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम) अन्वये वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क) भ.ज.(ड), वि.मा.प्र.व इ.मा.व.या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणा-या उमेदवारांनी सन २०१३-१४च्या उत्पन्नावर आधारित सक्षम प्राधिका-याचे ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे तरच त्यांना आरक्षणाचा लाभ दिला जाईल अन्यथा दिला जाणार नाही. सदर नियम महिला अरक्षणांतर्गत लाभ घेऊ इच्छिणा-यां उमेदवारांना ही लागू राहील.

५) अर्जदार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.अर्जदाराकडे महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र(डोमिसाईल) असणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.रिपभ/ प्र.क्र.६६/२०११/ई-१०,दि.२७-०६-२०११ नूसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचे जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे अशा प्रकरणी अधिवास प्रमाणपत्राची अट लागू होणार नाही.

६) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या अटी व इतर शासन निर्णय वित्त विभाग, संकीर्ण -१०००/ प्र.क्र.७०/सेवा-५,दि.११.८.२००० नुसार विहित अटी लागू राहतील. याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

७) निवड झालेल्या उमेदवारांना सेवेत रुजू झाल्यावर महाराष्ट्र नागरी सेवा सुधारित वेतन नियम २००९ अन्वये सहावा वेतन आयोगानूसार अनुज्ञेय वेतनश्रेणीमध्ये मुळ वेतन व त्यावर देय असलेले इतर शासकीय भत्ते अनूज्ञेय राहतील.

८) शा.नि.वि.वि.क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१-१०-२००५ नूसार नियुक्त केलेल्या उमेदवारास नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

**९) अर्ज करावयाची पध्दत**

I) अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज ए-४ **(A-4)** आकाराच्या पांढ-या जाड कागदावर सादर करावा. त्यावर पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील स्वतःचा फोटो स्वतःची स्वाक्षरी करुन अर्जावरील विहीत जागेवर चिटकवावा. अर्ज लिफाफ्यात बंद केल्यावर लिफाफ्यावर स्वतःचे पूर्ण नाव, कोणत्या पदासाठी अर्ज केलेला आहे ते ठळक अक्षरात लिहुन रेंखाकित करावे.

II) परिक्षा शुल्क म्हणून सफाईगार पदाला आरक्षण नसल्यामुळे सदर उमेदवारांनी रु.४००/- व मागासवर्गीय उमेदवरांसाठी रु.२००/- चे राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष (Demand Draft) अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. सदर धनाकर्ष **Dean, M.A.Podar Hospital, Worli, Mumbai** यांचे नावाने काढण्यात यावा.

III) उमेदवाराने अर्जावर चिकटवलेल्या फोटोव्यतिरिक्त स्वतःचे ०२ पासपोर्ट आकाराचे फोटो अर्जासोबत स्टेपल करुन जोडणे आवश्यक राहील.( फोटोच्या मागे स्वतःचे नाव पत्ता नमुद करावे) उमेदवारांने अर्जासोबत ०२ लिफाफा स्वतःच्या हस्ताक्षरामध्ये स्वतःचा संपर्ण पत्ता पीनकोडसह लिहून त्यावर रु.२५/- पोष्टाची तिकीटे लावून जोडणे आवश्यक राहील.

IV) उमेदवाराला फक्त दोन पदासाठी प्राध्यान्यक्रम देता देईल. (उदा.-सेवक, शिपाई) उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जातील सर्व रकाने भरणे आवश्यक आहे. जी बाब अर्जदारास लागु होत नाही तेथे **लागु नाही** असे नमुद करावे. अर्जदाराने अर्जात जो प्रवर्ग नमुद केलेला असेल त्याच प्रवर्गाकरीता अर्जदाराचा विचार केला जाईल. तसेच अर्जावर स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक किंवा घरातील दुरध्वनी क्रमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

V) शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

VI) भरलेला अर्ज **मा. अधिष्ठाता, म.आ.पोदार रुग्णालय, डॉ. ए.बी.रोड, वरळी, मुंबई-४०००१८** या पत्यावर दिलेल्या अंतिम तारीख व वेळेच्या आत पोहोचतील या बेताने पोस्टाने किंवा कार्यालयीन वेळेत हस्तपोच जमा करावेत.

VII) अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.३१ जानेवारी २०१५ असून त्यादिवशी सायंकाळी ०४.३० पर्यंत अर्ज स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पोष्टाने झालेल्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदरचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

**१०) इतर महत्वाच्या सुचना**

I) अर्जदारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
II) परिक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवाराने आपले प्रवेशपत्र बरोबर आणले पाहिजे. तसे प्रवेशपत्र नसल्यास उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.
III) उमेदवारास परिक्षेसाठी / मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल, त्यासाठी प्रवासखर्च दिला जाणार नाही.
IV) एकदा स्विकारलेले अर्ज आणि शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोद घ्यावी.
V) लेखी परिक्षेसाठी फक्त काळया बॉल पेनचा वापर करणे बंधनकारक आहे.
VI) परिक्षेचे स्वरुप लेखी परिक्षेस ७५ गुण व मुलाखतीस २५ गुण असे एकुण १०० गुण असे राहील. तसेच लेखा परिक्षेला प्राप्त गुण विचारात घेवून ०१ पदासाठी ०३ या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.
VII) लेखी परिक्षेला मराठी सामान्य ज्ञान व गणित या विषयांवर वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्न असतील.
VIII) एकाच स्थानासाठी दोन किंवा अधिक उमेदवारास समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय दि. २७-०६-२००८ मधील तरतुदीच्या अधिन राहून प्राध्यान्यक्रमाने उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल. तसेच लेखी परिक्षेतील प्राप्त गुण विचारात घेवून पात्र उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोंलावण्यात येईल.

**११) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे (सांक्षाकित प्रती जोडाव्यात)**

I) विहित नमुन्यातील अर्ज (अर्जासोबत ०२ पासपोर्ट आकाराचे फोटो स्टॅपल करुन जोडावेत)
II) शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे/गुणपत्रे
III) जन्मदिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्म नोंद दाखला/शांलात प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला
IV) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवाराने सक्षम प्राधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र
V) वय वर्ष व अधिवास प्रमाणपत्र
VI) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवाराने सक्षम प्राधिका-यांनी दिलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र
VII) खुल्या प्रवर्ग रु.४००/-व मागासवर्गीय प्रवर्ग उमेदवारांसाठी रु.२००/-चे राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष(Demand Draft)

**१२) खालील उणिवा असलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील**

I) विहीत नमुन्यात नसलेले अर्ज
II) फोटोवर व अर्जावर स्वतःची स्वाक्षरी नसलेले अर्ज
III) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज
IV) विहित पात्रता पूर्ण न करणा-या उमेदवारांचे अर्ज
V) मजकुर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेले अर्ज
VI) आवश्यक प्रमाणत्राच्या प्रमाणित सत्यप्रती न जोडलेले अर्ज
VII) दोन पेक्षा जास्त पदांसाठी प्राध्यान्यक्रम दिलेले अर्ज

१३) जाहीरातीमध्ये दर्शविण्यात आलेली अर्हता ही किमान अर्हता आहे . हि किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबधीत पदाच्या निवडीसाठी पात्र ठरणार नाही. तसेच अर्ज केला किंवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेला बोलवण्याच्या अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही याची नोंद घ्यावी.

१५) सदरील जाहिरात महाराष्ट्र शासनाची वेबसाईट www.maharashtra.gov.in व या रुग्णालयांची वेबसाईट www.ayurvedinstitute.com वर प्रसिध्द करण्यांत आली आहे. गुणवत्ता यादी व अंतिम गुणवत्ता यादी उमेदवारांना या रुग्णालयाचे संकेतस्थळावर पाहाता येईल. तद्संबधी काही शंका असल्यास या कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांक ०२२-२४९३३५३३ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

१६) भरती नियम व निकषामध्ये भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शासन अधिसुचना/परिपत्रक/पत्रानूसार काही बदल झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तसेच निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१७) रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता, म.आ.पोदार रुग्णालय, मुंबई हे स्वतःकडे राखून ठेवीत आहेत. याबाबतीत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

**१८)** अ) परिक्षेची तारीख :- दि. १५-०३-२०१५ वेळ :-स. ११:०० ते ०१:०० ठिकाण :- प्रवेशपत्रावर नमुद करण्यात येईल.

ब) परिक्षेचा निकाल :- दिनांक १६-०३-२०१५ रोजी या रुग्णालयाच्या संकेतस्थळावर घोषीत करण्यात येईल तसेच रुग्णालयाच्या नोटीसबोर्डवर लावण्यात येईल

| | | | |
|---|---|---|---|
| **क)** | **मुलाखतीचा दिनांक** | **:-** | **दि. १७-०३-२०१५ वेळ सकाळी ११.०० पासून** |
| **ड)** | **मुलाखतीचे ठिकाण** | **:-** | **अधिष्ठाता यांचे दालन, म.आ.पोदार रुग्णालय, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई** |
| **ई)** | **अंमित निकाल** | **:** | **दि.१८-०३-२०१५ रोजी या रुग्णालयाच्या सांकेतस्थळावर व नोटीस बोर्ड वर लावण्यात येईल.** |

**महत्वाची सुचना:-**

उपरोक्त स्पर्धात्मक परिक्षेच्या लेखी परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे शॉर्टलीस्ट करुन मुलाखती घेण्यात येणार असून त्यांच्या लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार व रिक्त पदांच्या संख्येच्या तुलनेत मर्यादीत उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. लेखी व मुलाखतीचे गुण एकत्रित करुन अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. मुलाखती घेण्यापूर्वी गुणवत्ता धारक उमेदवारांच्या मूळ प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येवून केवळ पात्र उमेदवारांच्याच मुलाखती घेण्यात येतील. अंतिम गुणवत्ता यादी नंतर मूळ प्रमाणपत्र पडताळणीत अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उमेदवार अपात्र ठरल्यास त्याला उमेदवारीसाठी दावा करता येणार नाही. तसेच एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल. तसेच त्या-त्या पदाची अंतिम गुणवत्ता सुचीमधून प्रतिक्षा सुची तयार करण्यात येईल. सदर प्रतिक्षा सुचीची वैधता ०१ वर्षापर्यत राहील.

**सही/-**
**अधिष्ठाता**
**म.आ.पोदार रुग्णालय,वरळी,मुंबई**

**अर्जाचा नमुना**

**महाराष्ट्र शासन**

**म.आ.पोदार रुग्णालय वरळी, मुंबई**

**..................................... या पदासाठी अर्ज**

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवा तसेच फोटोवर क्रॉस स्वाक्षरी करावी |
|---|
| उमेदवाराची सही |

| कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरला आहे | प्राध्यान्यक्रम | महीला आरक्षण लाभार्थी | आवक क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |

१) संपूर्ण नांव :

| | | |
|---|---|---|
| आडनाव | स्वतःचे नांव | वडीलांचे /पतीचे नांव |

२) पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) :

दुरध्वनी क्र.एसटीडी कोडसह
भ्रमणध्वनी क्रमांकआवश्यक

३) जन्मदिनांक : वर्ष महीना दिवस

४) दिनांक ३१ डिसें २०१४ रोजीचे वय :- वर्ष महिना दिवस

५) राष्ट्रीयत्व :- अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे का ? होय ( ) /नाही ( ) विवाहित/अविवाहित :- होय ( )/नाही ( )

पुरुष ( ) / स्त्री ( )

६) ज्या प्रवर्गासाठी अर्ज करावयाचा आहे त्या ठिकाणी (✓ ) अशी खुण करावी. एकापेक्षा जास्त खुणा केल्यास अर्ज बाद केला जाईल.

| अ.जा. (SC) | अ.ज. (ST) | वि.जा.(अ)/भज (VJA)(NT) | इ.मा.व. (OBC) | वि.मा.प्र. (SBC) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | शाळेचे/ बोर्डाचे / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण केलेल्या परिक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८)

| डी.डी. क्रमांक | दिनांक | रुपये | बँकेचे नाव |
|---|---|---|---|
| | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री./श्रीमती/कुमारी ............................................................. प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती पूर्णतः खरी असून प्रमाणपत्रे तपासणीत ती खोटी आढळल्यास मी निवडीसाठी / मुलाखतीसाठी पात्र राहणार नाही. तसेच माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्रकाचा नमुना-"अ"

## प्रतिज्ञापत्र

**(अर्जासोबत जोडणे आवश्यक)**

मी श्री./श्रीमती/कुमारी ........................................................................................
प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, मी श्री यांचा मुलगा/मुलगी/पत्नी, वय....... वर्ष, राहणार.....................................
.................................................................... .............................. याद्वारे असे जाहीर करतो / करते की,

१) मी .......................... या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२) मी विवाहित / अविवाहीत आहे. आज दि ३० जून २०१४ रोजी मला..........(संख्या) इतकी हयात अपत्ये आहेत. त्यापैकी दिनांक २८-मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या आपत्यांची संख्या..........आहे (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या आपत्यांची संख्या ०२ पेक्षा जास्त असल्यास दि.२८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या आपत्यांमुळे या पदासाठी नियुक्ती मिळण्यास मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

दिनांकः-

ठीकाणः- (उमेदवाराची स्वाक्षरी)

---

## प्रवेश पत्र

**(अर्जासोबत जोडणे आवश्यक)**

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवा तसेच फोटोवर क्रॉस स्वाक्षरी करावी |
|---|
| सही |

१. उमेदवाराचे नांव :-

२. संपूर्ण पत्ता :-

३. अर्ज केलेले पद :-

४. परीक्षा बैठक क्रमांक :-

परीक्षेचे ठिकाण :- दिनांक :-

राजपत्रित अधिकाऱ्यांचे सही व नांव    राजपत्रित अधिकाऱ्याचा शिक्का

## म.आ.पोदार रुग्णालय,वरळी, मुंबई.१८

मागासवर्गीय व इतर संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासंदर्भातील कार्यक्रमाची सर्वसाधारण रुपरेषा सदर कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता यांना राहील.

| | |
|---|---|
| अर्ज उपलब्ध होण्याचा दिनांक | ०१ जानेवारी २०१५ |
| अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक | ३१ जानेवारी २०१५ |
| लेखा परिक्षेचा दिनांक | १५ मार्च २०१५ |
| लेखा परिक्षेचा निकाल | १६ मार्च २०१५ |
| मुलाखतीचा दिनांक | १७ मार्च २०१५ |
| अंतिम निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १८ मार्च २०१५ |